CMYK

दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

▶ RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com lakshamaha.dhule@gmail.com lakshamaha.nsk@gmail.com

▶ धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ४ थे ▶ अंक : २४७ वा ▶ सोमवार दि. ३ जुलै २०२३ ▶ किंमत : २ रु. ▶ पृष्ठे : ६

## आता ट्रीपल इंजिनचे सरकार : मुख्यमंत्री शिंदे



**मुंबई ।** अजित पवारांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. शिंदे म्हणाले, आज अजित पवार आणि त्यांचे काही सहकारी आमदारांनी आपल्या शिवसेना-भाजपा युतीच्या सरकारला पाठिंबा दिला आहे. नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखालील जे डबल इंजिनचं सरकार आहे, त्याला आता ट्रिपल इंजिन जोडलं आहे. आता राज्याचा विकास बुलेट ट्रेनच्या वेगाने पुढे धावेल. याचा महाराष्ट्राच्या जनतेला फायदा होईल आणि राज्याचा विकास अतिशय वेगाने होईल.

## न्यूज कॉलम

### केंद्रीय तपास यंत्रणांचा गैरवापर : विजय राऊत

**नाशिक ।** देशात २०१४ मध्ये नरेंद्र मोदी पंतप्रधान झाले आणि त्यांनी केंद्रीय तपास यंत्रणांचा गैरवापर करून देशभरातील विरोधी पक्षातील लोकांना आपल्याकडे घेवून सत्ता मिळवण्याचं साधन तयार करत आहे. असा आरोप ओबीसी विभागाचे उत्तर महाराष्ट्र काँग्रेस अध्यक्ष विजय राऊत यांनी काल केला.

राऊत यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, हे देशाच्या लोकशाहीसाठी अत्यंत घातक असून यापुढील काळात लोकशाही टिकेल की नाही? अशी शंका निर्माण होण्यास सुरुवात झाली आहे. तरी देशभरातील सर्व काँग्रेस विचारांच्या लोकांनी एकत्र येऊन काँग्रेसच्या नेतृत्वाखाली पुन्हा एकदा ज्याप्रमाणे स्वातंत्र्यलढा लढला गेला त्याप्रमाणे लोकशाही वाचवण्यासाठी एकसंघ होऊन लढणे गरजेचे आहे. शिवाय मागील वर्षी स्थापन झालेले शिंदे सरकार आणि काल पार पडलेला अजित पवारांचा शपथविधी सर्वसामान्य माणसाला कधीही आवडणार नाही याचे उत्तर आगामी निवडणुकांमध्ये जनता निश्चित देइल. अशीही प्रतिक्रिया विजय राऊत यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात नमूद केली आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेसला खिंडार... अजीत पवारांचे बंड

## महाराष्ट्रात राजकीय भुकंप, अजीत पवार उपमुख्यमंत्रीपदी, राष्ट्रवादी काँग्रेसचे आठ आमदारही मंत्री

**मुंबई/धुळे । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अजित पवार मागील काही दिवसांपासून पक्षात नाराज असल्याची चर्चा होती, त्याची प्रचितीही आज आली. अजित पवार यांनी मंत्रिपदाची शपथ घेण्यापूर्वी विरोधीपक्षनेतेपदाचा राजीनामा दिला. अजित पवार आणि आठ आमदारांनी राजभवनावर मंत्रिपदाची शपथ घेतली. अजित पवारांकडे उपमुख्यमंत्रिपद सोपवण्यात आले. अनिल पाटील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रतोद होते, तेही अजित पवार यांच्यासोबत बंडात सहभागी झाले. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसने जितेंद्र आव्हाड यांच्याकडे ही जबाबदारी दिली आहे. त्याशिवाय होता. राष्ट्रवादी काँग्रेसने जितेंद्र आव्हाड यांच्याकडे विरोधीपक्षनेतेपद सोपवले आहे.

जितेंद्र आव्हाड यांच्याकडे विरोधीपक्षनेतेपद दिल्यामुळे राज्याला मुख्यमंत्री आणि विरोधी पक्षनेता एकाच जिल्ह्यातून मिळाला आहे. एकनाथ शिंदे आणि जितेंद्र आव्हाड हे ठाण्याचे आहेत. एकाच जिल्ह्यातील मुख्यमंत्री आणि विरोधीपक्षनेतेपद होण्याची ही पहिलीच घटना असेल.

आज सकाळपासून अजित पवारांच्या देवगीरी बंगल्यावर अजित पवार समर्थक आमदारांची बैठक सुरू होती. या बैठकीनंतर अजित पवार राजभवनावर दाखल झाले आहेत. आता अजित पवार हे राष्ट्रवादी काँग्रेसच्या जवळपास ३० आमदारांसह शिंदे-फडणवीस सरकारमध्ये सामील होणार असल्याची माहिती दुपारी मिळाली. विशेष म्हणजे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हेही राजभवनाच्या दिशेनं रवाना झाले. त्यामुळे पुढील काही तासांत अजित पवारांसह राष्ट्रवादीचे काही नेते मंत्रीपदाची शपथ घेणार असल्याचीही चर्चा सुरू झाली.

अजित पवार यांनी काही दिवसांपूर्वी मला विरोधी पक्षनेतेपदाच्या जबाबदारीतून मुक्त करा आणि पक्ष संघटनेची जबाबदारी द्या, अशी मागणी अजित पवारांनी केली होती. त्यानंतर अजित पवार पक्षात नाराज असल्याच्या चर्चा सुरू होत्या. अजित पवार हे राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्ष पदासाठी उत्सुक असल्याचं बोललं जात होतं. त्यासाठी अजित पवार आपल्या समर्थक आमदारांच्या वतीने पक्षावर दबाब टाकत होते, अशीही चर्चा सुरू होती. परंतु पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्याकडून याबाबत कुठलाही निर्णय घेण्यात आला नाही, की तशी चर्चाही नाही, त्यामुळे अजित पवार यांनी टोकाची भुमिका घेत अखरे बंडखोरी केली. त्यानंतर ते राजभवनावर दाखल झाले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत अजीत पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची राज्यपाल रमेश बैस यांच्यासमोर उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. विरोधीपक्ष नेताच सत्तेत सहभागी झाल्याची ऐतिहासीक घटना महाराष्ट्रात घडली असून त्यामुळे राजकीय उलथापालथ कमालीची चर्चेची ठरली आहे.

### लोकांसमोर भुमिका मांडू - शरद पवार

**कुणी काहीही दावा करावा, माझं काहीही म्हणणं नाही. माझा महाराष्ट्रातील लोकांवर विश्वास आहे, मी त्यांच्याकडे जाईन, त्यावर लोक निर्णय घेतील. राष्ट्रवादी हा पक्षच नव्हता. आमचे काही मतभेद काँग्रेसशी झाले, आणि पक्ष नसताना आम्ही पक्ष स्थापन केला. पहिला पक्ष इतरांनी नेला असेल, पण त्याचा परिणाम आमच्यावर झाला नाही. त्यामुळे कुणी काहीही दावा केला, तरी आम्ही आमची भूमिका लोकांसमोर मांडू. माझी खात्री आहे की आम्हाला लोकांचा पाठिंबा मिळेल, असेही शरद पवार यांनी सांगितले.**







### राष्ट्रवादी पक्षावरच काम- अजीत पवार

**यावेळी अजितदादांनी राष्ट्रवादी पक्षावर दावा केला. अजित पवार म्हणाले, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष म्हणून आम्ही काम करणार आहोत, घड्याळ चिन्हावरच आम्ही निवडणुका लढणार आहोत. देशपातळीवरील सध्या जी परिस्थिती आहे, त्याचा विचार केला असता विकासाला महत्व दिले पाहिजे, हे सर्व सहकाऱ्यांचे मत होते, नऊ वर्षांपासून मोदी सरकार चांगले काम करीत आहे, त्यांना पाठिंबा दिला पाहिजे. मोदींमुळे देशाचा विकास होत आहे. राज्यामध्ये विकासाला महत्व दिले पाहिजे, त्यामुळे राज्यात मजबूत खंबीर नेतृत्वाची गरज आहे. केंद्रीय निधी कसा मिळेल, यासाठी प्रयत्न केला जाईल, असे अजित पवार म्हणाले.**

### राष्ट्रवादी पक्षाचे अन्य मंत्री

अजित पवार -उपमुख्यमंत्री, छगन भुजबळ, दिलीप वळसे-पाटील, हसन मुश्रीफ, धनंजय मुंडे, धर्मारावबाबा आत्राम, आदिती तटकरे, संजय बनसोडे, अनिल पाटील.

### सर्वांनी मिळून हा निर्णय..

**शिंदे-फडणवीस सरकारमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या बहुसंख्य आमदारांनी जाण्याचा निर्णय घेतला. जर आम्ही शिवसेनेसोबत जाऊ शकतो, तर भाजपसोबतही जाऊ शकतो. बहुतांश नेत्यांना माझा निर्णय मान्य आहे. पक्षाचे चिन्ह व नाव आमच्याकडेच, आम्ही पक्षाच्या चिन्हावरच निवडणूक लढवू, पक्ष अधिक मजबूतीने पुढे नेण्याचा प्रयत्न करणार असून सर्वांनी मिळून हा निर्णय घेतला असल्याचेही उपमुख्यमंत्रीपदी अजित पवार यांनी सांगीतले. राज्यपालमहोदयांनी आम्हाला शपथ दिली. अजूनही मंत्रिमंडळ विस्तार केला जाणार आहे. त्यातही इतरांना मंत्रिपदे मिळणार. अनेक दिवस चर्चा सुरू होती. शुक्रवारी विरोधी पक्षनेते पदाचा राजीनामा दिला. पक्षाच्या वर्धापन दिनाला भूमिका मांडली होती. इथून पुढे तरुणांना संधी देणं गरजेचं आहे. वेगवेगळ्या प्रांतात नवे कार्यकर्ते पुढे आणले पाहिजे तसा आमचा प्रयत्न आहे.**

### महाराष्ट्रात विकासाचा नवा अध्याय लिहू : देवेंद्र फडणवीस

**राज्याच्या राजकारणात खळबळ उडाली आहे. राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांनी बंडखोरी करत उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली आहे. राष्ट्रवादीतील महत्त्वाचे नेते आणि अनेक आमदारही अजित पवार यांच्यासोबत आहेत. अजित पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर विद्यमान उपमुख्यमंत्री तसेच भाजपाचे नेते देवेंद्र फडणवीस यांनी पहिली प्रतिक्रिया दिली आहे. जे घडले, ते महाराष्ट्राच्या हिताचे आहे. याद्वारे महाराष्ट्रात आम्ही विकासाचा नवा अध्याय लिहू. एकनाथ शिंदे, अजित पवार आणि मी असे तिघेही मिळून महाराष्ट्राला पुढे नेऊ. आम्ही एक अतिशय प्रगल्भ, पुरोगामी, विकास करणारे सरकार देऊ, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.**

## मद्यतस्कर दिनु डॉनचे नेपाळमध्येही अवैध उद्योग : २१ गुन्हे असल्याचे उघड

**धुळे । प्रतिनिधी**

मद्यतस्कर दिनु डॉन ऊर्फ दिनेश निंबा गायकवाडचे नेपाळमध्येही उद्योग असल्याचे समोर आले असून ते कोण कोणते आहेत, याची माहिती पोलीस घेत आहेत, तसेच त्याच्यावर २१ गुन्हे दाखल असून मध्यप्रदेश, गुजरातमधून स्पिरिट आणत होता. स्थानिक गरजुच्या मजबुरीचा फायदा घेवून राज्यात विविध ठिकाणी बनावट दारूचे कारखाने चालवीत असल्याचे तपासात उघड झाले.

धुळे तालुका पोलीस ठाण्यात दाखल गुन्हयातील मुख्य आरोपी दिनेश निंबा गायकवाड उर्फ दिनू डॉन (रा.शिरुड ता.धुळे) यास धुळे तालुका पोलीसांनी २९ जूनला अटक केली होती. त्याला न्यायालयात हजर केले असता त्यास न्यायालयाने पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले. पोलिस निरीक्षक दत्तात्रय शिंदे यांनी दिनु डॉन याची चौकशी केली असता त्याने बनावट दारु बनविण्याकरीता राज्यात वेगवेगळया ठिकाणी बनावट दारुचे कारखाने उभारले. दारु बनविण्यासाठी मध्य प्रदेश, गुजरात येथुन स्पिरीट आणि बनावट दारुसाठी लागणारा इतर कच्चा माल व साहित्य आणला, परिसरातील स्थानिक गरजु मुले, लोकांना पैसा देत त्यांचा या अवैध व्यवसायासाठी फायदा घेतला, त्यांच्याकडुन बनावट दारु तयार करणे, तयार केलेली बनावट दारु तो त्याच्या साथीदार आणि हस्तकामार्फत चंद्रपुर, गडचिरोली लातुर, परभणी, सोलापुर आणि इतर दुर्गम आणि मागास भागात वाहतुक करुन छुप्या पध्दतीने विक्री करीत असल्याची माहिती दिली. इतर राज्यातही या प्रकारचे गुन्हे केल्याची शक्यता असल्याने त्यादृष्टीने निरीक्षक शिंदे तपास करीत आहेत.

दिनू डॉनने नेपाळ या देशातही काही व्यवसाय सुरु केल्याचे त्याने तपासात सांगितले. त्याने सुरु केलेल्या व्यवसाय कोणते आहेत.त्याबाबत पोलिस माहिती मिळवित आहेत. दिनू डॉनवर तब्बल २१ गुन्हे दाखल आहेत. त्यात धुळे तालुका पोलिसात ११, धुळे शहर, आझादनगर, शिरपुर शहर, जळगांव एम.आय.डी.सी.पोलीस ठाणे, पारोळा, खुलताबाद, सायखेडा पोलीस ठाण्यात प्रत्येकी एक गुन्हा दाखल आहे. तसेच गोंड पिंपरी (चंद्रपुर) पोलीस ठाण्यात व एक्साईज पोलीस स्टेशन, नाशिक येथेही गुन्हा दाखल आहे. तसेच बऱ्याच गुन्हयात तो फरार असल्याचे देखील तपासात आढळले. निरीक्षक शिंदे तपास करीत दिनू डॉनकडुन झालेल्या गुन्ह्याबाबत माहिती मिळविण्यात येत आहे.

## खंबाळे पटेल विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे नवोदय परीक्षेत यश

**शिरपूर ।** तालुक्यातील खंबाळे येथील आर.सी.पटेल माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी नवोदय परीक्षेत यश प्राप्त केले.

नवोदय विद्यालयात इयत्ता ६ वी त प्रवेशासाठी ५ वी च्या विद्यार्थ्यांची प्रवेश परीक्षा घेतली जाते. या परीक्षेत प्रणय रवींद्र माळी व मयूर वासूदेव बंजारा या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. त्यांचा प्रवेश नवोदय विद्यालयात निश्चित झाला आहे. विद्यार्थ्यांना शिक्षक एम.जी.अहिरे, ए.बी.महाजन, आर. एल. तवर यांचे मार्गदर्शन लागले. संस्थेचे अध्यक्ष अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उद्योगपती चिंतनभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, सचिव प्रभाकरराव चव्हाण, सर्व संचालक मंडळ, सीईओ डॉ. उमेश शर्मा, प्राचार्य आर.एन.पवार, सर्व शिक्षक, पालक, ग्रामस्थ यांनी अभिनंदन केले.

## शिंदखेडा येथे आयशर उलटून ३ ठार : दोन जखमी







**चिमठाणे । प्रतिनिधी**

दोंडाईचा-शिंदखेडा रोडवरील लक्ष्मीनारायण मंदिराजवळ साईनगर येथे भरधाव वेगातील आयशर उलटून झालेल्या भिषण अपघातात तीन जण ठार, दोन जण जखमी झाले. अपघातात आयशरसह दुचाकीचा चक्काचूर झाला.

दोंडाईचाहून येणारी आयसर (एमएच१९/सीवाय ८१५४) भरधाव वेगाने आज सकाळी शिंदखेडामार्गे जळगावकडे जात होती. साईनगरजवळ वळणावर चालकाचे नियंत्रण सुटून रस्त्याच्या मध्यभागी असलेल्या डिवाइडरवर आयशर आदळून उलटली. उलटल्याने पायी चालत असलेल्या दोन महिला मंगलाबाई माळी, नयनाबाई बोरसे, स्कुटरस्वारवर त्याखाली दाबले गेले. त्यात गंभीर दुखापत झाल्याने त्यांना शासकीय रूग्णालयात उपचारार्थ दाखल केले. उपचार सुरू असताना मंगलाबाई माळी, नयनाबाई बोरसे यांचा मृत्यु झाला. त्यांच्यापाठोपाठ स्कूटर स्वार पोस्टमन जयराम माळी यांचा उपचार सुरु असतांना मृत्यू झाला. चालक लक्ष्मण चौधरी यांच्यावर उपचार सुरू असून प्रकृती गंभीर आहे. गाडीत खत सामग्री भरलेली होती, ओव्हर लोड असल्यामुळे गाडी स्लीप झाल्याचे बोलले जात आहे. दोंडाईचा व शिंदखेडा पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी केली. अपघातात तीन जण ठार झाल्याने शहरासह परीसरात हळहळ व्यक्त होत आहे. अपघातात आयशरचे मोठे नुकसान झाले असून केबीनचा बराचसा भाग निखळून पडला होता, त्यावरुनही अपघाताची भिषणता दिसून येत होती.

### गतीरोधकाची नसल्याने अपघात

**शिंदखेडा ते दोंडाईचा कडे जाणाऱ्या रस्त्यावर गतिरोधक नाही, रस्त्यावर गतिरोधक टाकण्याची मागणी काही महिन्यापासून प्रशासनास स्थानिक नागरिक करत आहेत. संबंधित विभागास वारंवार निवेदने देऊनही प्रशासन या कडे सोयीस्कर दुर्लक्ष करत असल्याने अपघाताचे प्रमाण वाढत चालले आहे. या रस्त्यावर वाहनधारक भरधाव वेगाने वाहन चालवतात. याच रस्त्यावर पायी फिरणारे व रस्त्या लगत असलेल्या कॉलनी परिसरातील नागरिकांची चांगली वर्दळ आहे, तसेच व्यावसायीकांचीही रहदारी जास्त प्रमाणात असते, परंतु या रस्त्यावर गतिरोधक नसल्यामुळे भरधाव वेगाने वाहन ये जा करतात. त्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढले आहे. वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले, नागरीकांनी एकत्र येत पोलिसांकडे तत्काळ गतीरोधक बसविण्याची मागणी केली.**

## राष्ट्रवादीचे कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांमध्ये संभ्रम कायम

राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता गमावलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सध्या प्रचंड अस्वस्थता आहे. पुढे काय होणार यावरून पक्षातील वरिष्ठ नेत्यांपासून पहिल्यांदा निवडून आलेल्या आमदारांपर्यंत सगळेच अस्वस्थ असून त्यावर विचारमंथन करण्यासाठी अनौपचारिक बैठकांचे सत्र सुरू आहे. तसेच सर्वोच्च न्यायालयाचा निकाल नक्की काय लागेल याबाबत अनेक तर्क लढविले जात आहेत. या पार्श्वभूमीवर आपली भूमिका काय असावी याबाबत राष्ट्रवादीचे नेते संभ्रमात आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील बहुतांश लोकप्रतिनिधी हे आपापल्या मतदारसंघातील अत्यंत वजनदार नेते आहेत. पक्षापेक्षा स्वतःच्या प्रतिमेवर आणि अनेक वर्षे केलेल्या कामावर निवडून येणाऱ्या लोकप्रतिनिधींचा समूह अशी राष्ट्रवादी काँग्रेसची ओळख आहे. या हमखास निवडून येणाऱ्यांनी एकत्र येत सत्तावर्तुळात स्वतःचा हिस्सा मिळवण्यात कायम यश मिळवले आहे. काँग्रेसमधून शरद पवार वेगळे होत त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना करून निवडणुका लढवल्यानंतर लगेचच पुन्हा काँग्रेससोबत आघाडी केली. तब्बल १५ वर्षे एक हाती सत्ता राबवल्यानंतर पहिल्यांदाच मोदी लाटेत काँग्रेससोबत राष्ट्रवादीचीही वाताहत झाली. फडणवीस सरकारची पाच वर्षे कशीबशी लोटल्यानंतर शिवसेनेने बंडाचा झेंडा हाती घेतल्यावर राष्ट्रवादीला पुन्हा एकदा सत्तेत बसण्याची संधी मिळाल्याने या लोकप्रतिनिधींच्या समूहाला थोडासा दिलासा मिळाला खरा, पण अडीच वर्षांतच ही सत्ता गेल्यामुळे सध्या राष्ट्रवादीतील अस्वस्थता पुन्हा एकदा वाढली आहे.

गेल्या काही दिवसांपासून राष्ट्रवादीतील अनेक नेत्यांना संकटांचा सामना करावा लागला आहे. अनिल देशमुख, नबाब मलिक यांच्या अटकेपासून ते अजित पवार, हसन मुश्रीफ यासारख्या ज्येष्ठ नेत्यांच्या मागे लागलेला केंद्रीय तपास यंत्रणांचा ससेमिरा हे सगळेच प्रतिनिधी पाहत आहेत. त्यामुळे यापुढचा क्रमांक कोणाचा ही भीती ज्येष्ठ नेत्यांमध्ये आहे. दुसऱ्या बाजूला पहिल्यांदाच आमदार झालेल्या नेत्यांना वर्ष-दीड वर्षात होणाऱ्या निवडणुकांमध्ये काय होणार याची चिंता सतावते आहे.

### द्विधा मनस्थिती

**शिवसेनेच्या ४० आमदारांनी वेगळी चूल मांडून आपला उत्कर्ष साधून घेतला. तीच वाट आपण धरली तर काय हरकत आहे, असे म्हणणारेही नेते आहेत. तर, आता बाजूला झालो तर तात्कालिक फायदा होईल, पण निवडणुकांमध्ये मतदारांसमोर कोणत्या मुद्द्यांवर जायचे हा प्रश्न या नेत्यांमध्ये द्विधा मनस्थिती निर्माण करतो आहे.**



### आपण नेमके कोणासोबत

**अजित पवारांनी उपमुख्यमंत्री पदांची शपथ घेतली घेतली आहे. मात्र शरद पवार यांनी आपली भूमिका अजून स्पष्ट केलेली नाही. त्यामुळे राष्ट्रवादीचे कार्यकर्ते व पदाधिकारी संभ्रम अवस्थेत दिसून येत आहेत. तसेच आपण कोणासोबत अशी चर्चा देखील राज्यातील कार्यकर्त्यांमध्ये दिसून येत आहे.**



शोध बातमी

पुरुषोत्तम पाटील

मुख्य उपसंपादक

मो.७०५७०१११२६

## आम्ही शरद पवार यांच्या सोबतच : रणजीत राजे भोसले



**धुळे । प्रतिनिधी**

धुळेः गेल्या वीस वर्षापासून मी आदरणीय शरद पवार यांच्या विचाराने राजकीय व सामाजिक क्षेत्रात काम करीत आहे. आदरणीय पवार यांच्या शिव, फुले, शाहू, आंबेडकर या विचारावर माझा परिपूर्ण विश्वास आहे.

धर्मनिरपेक्ष, पुरोगामी, चळवळीच्या लोकांना घेऊन यापुढे मी आदरणीय शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली काम करण्याचे ठरविले आहे. तेच माझे नेते असून यापुढे त्यांच्या आदेशाने व विचारानेच मी सामाजिक, राजकीय क्षेत्रात काम करणार आहे, अशी प्रतिक्रीयाही राष्ट्रवादी काँग्रेसचे धुळे शहर जिल्हाध्यक्ष रणजीत राजे भोसले यांनी दिली.

## फडणवीसांच्या गुगलीवर पवारांचीच विकेट

महाराष्ट्रात काही दिवसांपूर्वी झालेल्या पहाटेच्या शपथविधीबाबत जनमानसांत प्रचंड उत्सुकता लागून राहिली होती. तत्कालीन राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांनी २३ नोव्हेंबर २०१९ रोजी पहाटे राजभवनात देवेंद्र फडणवीस यांना मुख्यमंत्रीपदाची शपथ दिली, तर अजित पवार यांना उपमुख्यमंत्रीपदाची शपथ दिली. पहाटेच्या शपथविधीमुळे महाराष्ट्राच्या राजकारणात एकच खळबळ उडाली होती. महाराष्ट्रातील सत्ता स्थापनेच्या या संघर्षाच्या वेळेस देवेंद्र फडणवीस यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांच्या पाठिंब्यावर सत्ता स्थापनेचा दावा करत भल्या पहाटे राजभवानावर जाऊन शपथ घेतली होती; परंतु अल्पावधीतच सरकार कोसळले. आजही फडणवीस यांच्या मनात ही सल कायम आहे. पहाटेच्या शपथविधीचे कवित्व अजूनही सुरूच आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एका मुलाखतीत अनेक दावे आणि गौप्यस्फोट केलेत. पहाटेचा शपथविधी हा शरद पवारांचा डाव होता, असा मोठा दावा फडणवीसांनी केला. एवढेच नव्हे तर भाजप आणि राष्ट्रवादीचे सरकार स्थापन करण्यासाठी पवार यांच्यासोबत बैठक झाली होती. पण शपथविधीच्या आधी ऐनवेळी पवारांनी माघार घेतली, असा दावा फडणवीसांनी केला. शिवाय सत्तेसाठी उद्धव ठाकरेंनी दगाबाजी करून पाठीत खंजीर खुपसल्याचाही आरोप त्यांनी केला. जाहीर कार्यक्रमात देवेंद्र फडणवीस यांनी पहाटेचा शपथविधी करून चूक केल्याचे अनेकवेळा बोलून दाखवले आहे. असा शपथविधी अचानक का घडवून आणला गेला? त्यातून काय साध्य झाले? त्या माध्यमातून कोणी कुणावर मात केली? कोणी कोणती भूमिका बजावली? त्यातून काय साध्य झाले? आणि शेवटी हा सगळा घाट का घातला गेला? असे एक ना अनेक प्रश्नांचे काहूर उठले होते. त्याबाबत आता हळूहळू पडदा उघडला जात आहे. त्यातूनच राजकारणातील भीष्म, जाणता राजा अशी ज्यांची प्रतिमा आहे ते गेले काही दिवस राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार आणि राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यात दावे - प्रतिदाव्यांतून वाकयुद्ध सुरू झाले आहे. राजकारणातील सारीपाटात जसे शह - काटशह दिले जातात अगदी तसाच पट व खेळी यावेळी खेळल्या गेल्याचे विविध नेत्यांच्या विधानांतून आता उघड होऊ लागले आहे. या विधानांमध्ये मुत्सद्देगिरी, गद्दारी, डबलगेम, गुगली असे अशा शब्दांचा भडीमार होऊ लागला आणि त्यातूनच एकमेकांवर विशेषणांची उधळण सुरू झाली आहे. ते करताना राजकारणातील जुन्या घटनांचा हवालाही देण्यात येत आहे आणि तो येथे आवश्यकच आहे असे आता दिसू लागले आहे. राज्यात १९७८ मध्ये काँग्रेसचे ज्येष्ठ नेते वसंतदादा पाटील यांच्या नेतृत्वाखालील सरकार सत्तेवर असताना त्यांच्या मंत्रिमंडळातून शरद पवार हे काही आमदारांना सोबत घेऊन बाहेर पडले आणि त्यांनी भाजपसोबत हातमिळवणी करत पुरोगामी लोकशाही आघाडीची स्थापना करून ते मुख्यमंत्री झाले. त्यावेळी त्यांनी केलेल्या या कृतीकडे एक धाडस म्हणून पाहिले गेले व तेव्हा चर्चाही झाली होती, पवारांचे तेव्हाच्या विरोधी पक्षांनी फार मोठे कौतुक केले होते. त्यांची ती खेळी म्हणजे बंडखोरी नव्हती, तर ती मुत्सद्देगिरी होती असे म्हटले गेले. आता राज्यात एक वर्षापूर्वी अशीच घटना घडली आणि त्यात एकनाथ शिंदे यांनी महाविकास आघाडीतून बाहेर पडून शिवसेनेला मोठे खिंडार पाडले आणि ४० आमदारांना सोबत घेऊन त्यांनी भाजपचे चाणाक्ष नेते देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करून त्यांच्यासोबत राज्यात भाजप - शिवसेना युतीचे सरकार स्थापन केले. आता शिंदे यांचे हे पाऊल म्हणजे फार मोठी गद्दारी आहे, असे विरोधकांचे नेते म्हणत आहेत. तोच धागा पकडून फडणवीस यांनी शरद पवारांवर जोरदार पलटवार केला आहे. पवारांनी तेव्हा केले ती मुत्सद्देगिरी होती आणि आता तेच शिंदे यांनी केले तर ती गद्दारी कशी? हा कुठला न्याय, असा सवाल करत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शरद पवार यांना डिवचले. फडणवीसांनी केलेल्या याच विधानाला नंतर पवारांनी उत्तर देताना फडणवीसांना तेव्हाचा इतिहास सांगितला. एकनाथ शिंदेंनी केली तर गद्दारी आणि पवारांनी केली तर मुत्सद्देगिरी. या विधानाला शरद पवारांनी उत्तर दिलं. ते म्हणाले, त्यांनी सांगावं कधी केली? आम्ही सरकार बनवले, पण त्यामध्ये भाजप माझ्याबरोबर होता. सगळ्यांना सोबत घेऊन सरकार बनवले. त्याच्यामध्ये त्यावेळचा जनसंघ होता. त्यांचे उत्तमराव पाटील हे उपमुख्यमंत्री होते. मला वाटते की, त्यावेळी हे (देवेंद्र फडणवीस) प्राथमिक शाळेत कदाचित असतील. त्यामुळे त्यांना त्या काळातील फारशी माहिती नसेल आणि त्या अज्ञानापोटी ते असे स्टेटमेंट करताहेत, असे प्रत्युत्तर देत पवारांनी फडणवीसांना घेरण्याचा प्रयत्न केला. पण शरद पवारांनी बेईमानी केली असे कुठेही न म्हणता फडणवीस यांनी एकनाथ शिंदेंची केस मेरिटची आहे असे स्पष्ट करून पवारांनाच गुगली टाकून त्यांना बोल्ड केले आहे. एकूणच पहाटेच्या या शपथविधीवरून सध्या फडणवीस आणि शरद पवार यांच्यात जोरदार जुंगलबंदी रंगली आहे. या जाहीर जुगलबंदीत चाणाक्ष फडणवीसांनी पवार यांची पुरती गोची केल्याचे दिसत आहे.

# दैदिप्यमान राजकीय कारकिर्दीचा लोकराजा वसंतरावजी नाईक!!



खरा लोक राजा वसंतरावजी नाईक जे महाराष्ट्राचे तब्बल १२ वर्षे म्हणजेच सर्वाधिक काळ मुख्यमंत्री राहिले याचे गमक शांत, सुस्वाभावी व सर्वांना सोबत घेऊन राजकीय प्रवास करणारे ते एक लोक राजा म्हणून उभा महाराष्ट्र त्यांना ओळखतो. त्यांच्या जयंतीनिमित्त बंजारा भटके समाज व तमाम महाराष्ट्रातील जनतेकडून १जुलै रोजी त्यांना विनम्र अभिवादन!

वास्तविक पाहता संयुक्त महाराष्ट्रात जन्मलेले यवतमाळ जिल्ह्यातील पुसद तालुक्यातील गहुली या गावात १जुलै१९१३ रोजी कै. वसंतराव फुलसिंग नाईक अतिशय सामान्य कुटुंबातून पुढे आलेले लोक राजा म्हणून महाराष्ट्र त्यांना ओळखतो. खऱ्या अर्थाने बंजारा समाजात सर्वप्रथम उच्च विद्या विभूषित असलेले, वकिली व्यवसायातून पुढे आलेले ते एक सच्चे जननायक होते यात तीळ मात्र शंका नाही ,कारण त्यांना शेती, शिक्षण, राजकारण या त्रिसूत्रीच्या आधारावर महाराष्ट्राला सर्व संपन्न करावयाचे होते.१९४३-४७ पुसद नगरपालिकेचे प्रमुख म्हणूनही त्यांनी यशस्वी काम केले. सर्वप्रथम निवडणुकीस उभे राहिल्यानंतर त्यांनी मध्य प्रदेशातील सरकारमध्ये १९५२ मध्ये महसूल मंत्री म्हणून कारकिर्दीला सुरुवात केली. त्यानंतर १९५७ मध्ये तेथूनच सहकार मंत्री तर पुढे मुंबई राज्यात कृषी मंत्री म्हणून आणि कन्नमवार साहेबांच्या मृत्यूनंतर (१९६३)मुख्यमंत्री म्हणून त्यांची दैदिप्यमान राजकीय कारकीर्द गाजलेली आहे.

शेतकरी संपन्न तर देश संपन्न : १९७२ चा दुष्काळ भयावह होता. जे या कालावधीमध्ये जन्मलेले महाराष्ट्रातील नव्हे देशातील नागरिक त्यांना या भूकंपाची दाहकता माहिती आहे. या काळात माणसं जगण्यासाठी अमेरिकेतून प्राण्याला खाऊ घातले जाणारे गहू (मिलू )आयात करावे लागले आणि याची जाणीव ठेवून वसंतरावजी नाईक साहेबांनी एक ध्यास घेतला. शेतकरी संपन्न झाला पाहिजे' शेतीपूरक व्यवसायाला चालना दिली पाहिजे' कृषी महामंडळाची स्थापना झाली पाहिजे, असे अनेक प्रयोग महाराष्ट्रामध्ये त्यांनी सुरू केले. महाराष्ट्रामध्ये अगदी अल्पावधीतच ४ कृषी विद्यापीठाची स्थापना, बियाणे महामंडळाची स्थापना, मक्तेदारी कापूस योजनेची स्थापना करून कृषी क्षेत्रामध्ये अनेक नवनवीन प्रयोग केले. ज्यामुळे अन्नधान्याच्या बाबतीमध्ये महाराष्ट्र स्वावलंबी होईल ही दूरदृष्टी केवळ वसंतरावजी नाईक साहेब यांच्याकडेच होती हे नाकारता येत नाही. वस्तुतः शेतकरी कुटुंबामध्ये जन्मलेला हा जननायक शेती व्यवसाय आणि शेतकरी संपन्न झाला पाहिजे असा ध्यास घेऊन उभ्या महाराष्ट्रामध्ये नव्हे देशांमध्ये एक आगळावेगळा प्रयोग करू पाहत होता. शेतकऱ्यांच्या बांधावर बैलगाडीतून प्रवास करत होता.ज्यातून शेतकरी संपन्न झाला पाहिजे यासाठी अनेक शेती संबंधी बदल घडवून आणले आणि अन्नधान्याच्या बाबतीत महाराष्ट्र दोन वर्षात स्वावलंबी झाला नाही तर मला फाशी द्या अशी भीमगर्जना करणारा पुणे येथील शनिवार वाड्यातुन जनतेला आवाहन केले आणि अगदी अल्पावधीमध्येच महाराष्ट्र राज्याला अन्नधान्याच्या बाबतीमध्ये सर्व पातळीवर स्वावलंबी केले हे कोणीही विसरू शकणार नाही.

जलक्रांतीचे अग्रदूत - शेती क्षेत्राला सिंचनाची जोड मिळाली पाहिजे यासाठी जलसिंचनाच्या अनेक योजना महाराष्ट्र मध्ये राबवल्या . कोयना धरणाच्या सारखे अनेक मोठमोठे धरण महाराष्ट्रामध्ये उभे करून शेती क्षेत्रामध्ये अमुलाग्र बदल केले. पाणी आडवा पाणी जिरवा यासारखे विविध दूरदृष्टीचे प्रकल्प राबवून जल क्षेत्रामध्ये क्रांती केली म्हणूनच जलक्रांतीचे अग्रदूत म्हणून वसंतरावजी नाईक साहेबांना देश विसरणार नाही हे त्रीकालावधीत सत्य आहे. आरे कॉलनीचा विकास, नवी मुंबईची स्थापना ,तसेच या ठिकाणी अनेक नवनवीन उद्योगाची उभारणी करून मुंबईचा चेहरा बदलण्याचा नवा प्रयत्न केला म्हणूनच नवी मुंबईचे निर्माते म्हणून नाईक साहेबांकडे पाहिले जाते यासाठीच नवी मुंबई विमानतळाला वसंतरावजी नाईक साहेब यांचे नाव द्यावे अशी आग्रही मागणी तमाम महाराष्ट्रवासियांकडून केली जात आहे. या जयंती प्रसंगी महाराष्ट्रातील तमाम वंचित ,भटके विमुक्त ,बहुजन ,ओबीसी समाजाकडून राज्यकर्त्यांना या मागणीची पूर्तता करण्याची सद्बुद्धी देवो अशी निसर्ग चरणी प्रार्थना केली जात आहे.

**सुदाम राठोड**

रोजगार हमी योजनेचे जनक : १९७२ मध्ये देश दुष्काळाने भरडला जात असताना महाराष्ट्राचे अग्रदूत माजी मुख्यमंत्री कै. वसंतरावजी नाईक साहेबांनी रोजगार हमी योजनेची मुहूर्तमेढ रोवली. जी आज च् छ-ठएॠ- या नावाने देशभर प्रसिद्ध आहे. जो यूपीए सरकारने ऐतिहासिक कायद्यामध्ये रूपांतरित केलेला आहे. ज्यामुळे देशातील तमाम मजुरांना सरकारद्वारे वर्षभरामध्ये किमान १०० दिवस रोजगार पुरवला पाहिजे अशी कायद्यामध्ये तरतूद करण्यात आलेली आहे. म्हणूनच रोजगार हमी योजनेचे जनक म्हणून वसंतराव नाईक साहेबाकडे संपूर्ण देश आसेने पाहतो आहे.

पंचायत राज आणि ग्रामीण विकास : खऱ्या अर्थाने ग्रामीण विकासाचा उद्धार करायचा असेल, तमाम बहुजन वंचित समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी आणि सर्व समावेशक (Inclusive Development) विकास साधावयाचा असेल तर पंचायत राज व्यवस्था बळकट करणे अत्यावश्यक आहे. यासाठीच सर्वप्रथम वसंतरावजी नाईक साहेब यांच्या काळात पंचायत राज व्यवस्था बळकटीचे अनेक ऐतिहासिक प्रयोग यशस्वी करण्यात आले. ज्यामुळे ग्रामपंचायत, पंचायत समिती, आणि जिल्हा परिषद सक्षम झाली .या यंत्रणेच्या माध्यमातून ग्रामीण विकास सहज शक्य करण्यास मदत झाली. याप्रसंगी उद्योगधंद्यांना प्रोत्साहन देणे, आर्थिक मदत देणे ,नव्या शेती तंत्राला प्रोत्साहन व चालना देणे, पशुपालन, कुक्कुटपालन , सहकारी दुग्ध उत्पादन सोसायटी स्थापन करणे अशा कुटीर उद्योगांना प्रोत्साहन देणे तसेच नवनवीन तंत्रज्ञानाचा अंगीकार करणारा महाराष्ट्र हा एकमेव राज्य म्हणून तत्कालीन कालावधीत ओळखला जाऊ लागला हे नाकारता येत नाही.

सध्या परिस्थितीचे राजकारण आणि तत्कालीन राजकारण -समाजकारण याचे परीक्षण केल्यास प्रचंड विरोधाभास दिसून येतो आहे. विरोधी पक्षांना विश्वासात घेऊन समाज विकास परिणामी देश विकास साधणारा लोक राजा म्हणून वसंतराव नाईक साहेबाकडे संपूर्ण देश पाहतो आहे. या जयंतीप्रसंगी तमाम देशवासीयाकडून वसंतरावजी नाईक साहेबांना विनम्र अभिवादन!!

## गुरुचे महत्त्व - संत राजिन्दर सिंह जी महाराज

आषाढ महिन्याची पौर्णिमा ही गुरु पौर्णिमा म्हणून साजरी केली जाते. या दिवशी आपण आपल्या शैक्षणिक तसेच आध्यात्मिक गुरूंचा आदर सत्कार करुन त्यांच्या प्रति श्रद्धा व कृतज्ञता व्यक्त करतो.

सांसारिक जीवनात जेव्हां आपल्याला एखादया विषयाचा अभ्यास करायचा असतो, तेव्हा आपण अशा व्यक्तीकडे जातो, जी त्यात पारंगत आहे आणि तो विषय ती व्यक्ति आपल्याला शिकवू शकते . अश्याच प्रकारे आपल्याला जर आपला आध्यात्मिक विकास करायचा असेल तर आपल्याला अश्या व्यक्ति कडे जावे लागेल जी अध्यात्मात पारंगत आहे.एक पुर्ण सद्गुरु आध्यात्मात पारंगत असतात. सुदैवाने प्रत्येक वेळी या पृथ्वीतलावर एक ना एक पुर्ण सदगुरु अस्तित्वात असतात , जे आपल्याला आपल्यातील आत्मिक शक्तीशी जोडण्यासाठी मदत करतात. प्रत्येक युगात असे संत महात्मे पृथ्वी वर येत असतात जे आमच्या आत्म्याला आंतरिक यात्रेवर घेऊन जाण्यात समर्थ असतात.



संत मताचे संत सांगतात की परमेश्वराची सत्ता ही कुठल्या न कुठल्या मानवी देहातून कार्य करत असते. मनुष्य इतर मनुष्यांकडूनच शिकत असतो. संत या जगात येतात आपल्याशी आपल्या स्तरावर येऊन बोलण्या साठी,अंतरिक अनुभव प्राप्त करण्याची पद्धत आपल्या भाषेत स्पष्ट करून सांगण्यासाठी, जेणे करुण ते आम्हालाही आंतरिक अनुभव करुन देऊ शकतील.केवळ बोलून किंवा वाचून अध्यात्म शिकता येत नाही. हे केवळ वैयक्तिक अनुभवातूनच शिकले जाऊ शकते आणि असा अनुभव मात्र आपल्याला संपूर्ण सदगुरूच देऊ शकतात. नामदाना नंतर सदगुरु शिष्याच्या अंतरी वास करतात. तेव्हां पासून ते प्रत्येक क्षणी शिष्याबरोबर राहतात व त्याला सगळ्या प्रकारे सुरक्षित ठेवतात. सदगुरुंचे हे संरक्षण केवळ या जगातच नाही तर त्यापलीकडेही कायम राहते . शिष्याच्या कर्माचा भार सदगुरू आपल्या खांद्यावर घेतात व सदैव त्याच्या अवती भवती राहतात. शिष्याच्या मृत्यु वेळी ते त्याच्या सोबतच असतात व त्याच्या पुढील प्रवासात त्याचे मार्गदर्शक बनतात. अश्या वेळी सद्गुरु आपल्या अंतरि प्रकट होतात व सदगुरू आम्हाला प्रेमाने हृदयी लावतात,ते आम्हाला दिव्य प्रकाश्याच्या मध्यभागी घेऊन जातात.

करुणा व ममतेने ओतप्रोत सद्गुरु आम्हाला संकटात पाहू शकत नाहीत. सदगुरु या जगी आम्हाला कर्मांच्या चिखलपासून दुर राहण्याची शिकवण देण्यासाठी येतात, आम्ही कर्माच्या चक्रव्यूहातून बाहेर पडावे, अशी त्यांची इच्छा असते, की ज्यामध्ये अडकून आपण पुन्हा पुन्हा या जगात येत असतो . त्यांची इच्छा असते की आपण आपल्या खर्या पित्याच्या घरी परत जावे , जिथे कोणताही क्लेश किंवा मृत्यु नाही.आमच्या जीवन काळात देखील सद्गुरु आमचे अनेक प्रकारच्या संकटा पासून रक्षण करतात. ते आमच्यावर विविध प्रकारे करत असणाऱ्या कृपांचे, मदतीचे आम्हाला ज्ञान देखील नसते. जो पर्यन्त आम्ही परमात्म्या सोबत एकरूप होत नाही, तो पर्यन्त आमची हर प्रकारे मदत करण्यासाठी सद्गुरु सदैव आमच्या सोबत राहतात. एकदा का पुर्ण सदगुरुद्वारे नामदान मिळाले की सद्गुरु आपल्या शिवनेत्रावर विराजमान होतात व जीवनातील प्रत्येक घडामोडी मध्ये आमची मदत करतात.

सदगुरू हे आपले खरे निस्वार्थ मदतगार असतात, मदतीच्या बदल्यात कोणत्याही प्रकारचा मोबदला ,नाव किंवा कीर्ति त्यांना नको असते. ते आपल्याला मदत करतात, कारण ते आपल्या सर्वांवर प्रेम करतात, त्यांचे स्वतःचे अंतःकरण प्रभु प्रेमाने ओत प्रोत भरलेले असते. जर आपल्याला या मानव देहाचे उद्दीष्ट पुर्ण करायचे असेल आणि आपल्या आत्म्यांला परमात्म्या शी एकरूप करायचे असेल तर आपल्याला पूर्ण सतगुरुंच्या च चरणी जावे लागेल. आपण परमेश्वराला प्रार्थना केली पाहिजे कि त्याने वर्तमान क्षणी या जगी आस्तित्वात असणाऱ्या पुर्ण सद्गुरुंच्या चरणी आम्हाला लवकरात लवकर घेउन जावे , जेणेकरून त्यांच्या योग्य मार्गदर्शनाखाली आपण आपली आध्यात्मिक यात्रा शक्य तितक्या लवकर पुर्ण करू शकू आणि आपल्या निजधामी पोहचून कायमस्वरूपी परमात्म्या मधे लीन होऊ.

### शब्दकोडे-११०



आडवे शब्द

१. दुसऱ्यावर अवलंबवून असणे ६. म हिरप ९. हिंदीतील सत्य १०. धाक, वचक ११. रामदासस्वामींचा हा ग्रंथ आधुनिक व्यवस्थापकांनाही उपयोगी १३. बोहारणीप्रम ाणेच याची हाकही लुप्त झालेली दिसते १६. मुलायम, मऊ १८. अखंड पडणारी (धार) १९. बढाई, फुशारकी २०. नंतर २१. पैसे देण्यास असमर्थ २३. बंदुकीच्या फैरी २५. नातेवाईक २८. मलई २९. लहान ३१. फरक, तफावत ३३. अभिनेता (हिंदी) ३५. दरवाजाची झाप ३७. शिकार ३८. गणपती ४०. मोठी नदी ४२. पोळी भाजण्याचे पात्र ४३. अजगर, विट्टीदांडूतील सहा ४४. शोध, माग ४६. वर्षानुवर्षे ४९. रवाळ ५१. अति उंचीचे वर्णन करणारे दोन वृक्ष ५२. शपथ ५३. पैशाचे सन्मानपूर्वक घेतले जाणारे नाव ५५. शहर, गाव ५७. मध ५९. चौकोनी पायऱ्यांनी विहीर ६०. विश्व, दुनिया ६१. चंद्र ६२. हिरवा (हिंदी) ६४. स्थानक ६५. जंगली ६७. हाताचा एक भाग ६९. सांगणे ७०. वन, रान ७१. राजबिंडा ७३. अर्धा 'र' ७५. जळलेला ७७. धनी ७९. अपेक्षाभंग होणे, गंडणे ८१. रचना करणारा ८२. अखेर, उदरभरणाची अखेर ८३. उत्तरेकडील शिवस्थान, विश्वेश्वराची नगरी

उभे शब्द

१. ट्रेकिंगला मराठी शब्द २. थोडक्यात राजमान्य राजेश्री ३. मिरवणूक ४. पत्यातील सुकामेवा ५. धमनी ६. पुष्परस ७. रड्या मनुष्य ८. कोल्हापूरची देवी ९. शेराला हा कधी तरी भेटतोच १२. डोंगर पोखरून काढलेला रस्ता १४. थाप, गप १५. सततची बडबड (ला.) १७. निकट, जवळ २१. नगरासंबंधी २२. यापेक्षा फळाच्या फोडी खाणे चांगले २३. आवड, रस २४. पोते, गोणपाट २५. नेता, आदर्श २६. लुच्चा, धूर्त २७. राजसभा ३०. जेमतेम ३१. काजळ-सुरमा इ.प्रकार ३२. अंगातील मस्ती ३३. पायात चप्पल न घालता ३४. सहाय्य ३६. वाचा, बोलणे ३९. बुद्धाच्या जन्मकथा ४१. कणव, कीव ४३. नौदल ४५. पं.रविशंकर यांचे वाद्य ४६. लहानमोठ्या वस्तू ४७. तक्क्याच्या जोडीचे टेकण ४८. पटकन ५०. गयावाया करणे ५४. शरणागताला दिलेले अभय ५५. दृष्टीभेट ५६. आकाश, नभ ५७. कबरीवरील वास्तु ५८. जाळणे ६३. क्रोध ६६. समीक्षक ६७. चर्चा, खलबत ६८. शेंगेवरील साल ७२. शिल्लक ७४. मान अडकवणारा ७६. संभाव्य संकट, जोखीम ७८. काठ, बाजू ८०. काचेची छोटीशी बाटली

### शब्दकोडे १०९ चे उत्तर

**आडवे उत्तर**

१.पर्वतारोहन ४.कदरदान ८.वाकडा ११.ठेला १२.खसखस १४.मास १५.रखवालदार १८.रेलचेल २०.हातोहात २२.सखी २३.लगत २५.रड २६.जंगल २८.तरू ३०.नाविक ३२.चावी ३४.सलगी ३६.गाज ३८.पाक्षिक ३९.माना ४०.लवण ४१.अंमळ ४२.जनक ४३.मतलब ४५.वाळू ४६.कमला ४८.सन ४९.सरबत ५२.शहारा ५४.वहाण ५५.खोल ५६.जयविजय ५८.कसकस ६०.कवळ ६१.पाव ६२.वसा ६४.पोट ६५.जयजयकार ६७.परवानगी ६९.पीळ ७१.कोट ७२.तांबट ७४.जन पळभार ७७.राज ७८.शव ७९.महाकाली ८०.लग्गा ८१.सहनशीलता

**उभे उत्तर**

१.१.पर्वा २.तारणहार ३.हत्यार ४.कलाल ५.रखरखीत ६.दास ७.नखरेल ९.कमाल १०.डास ११.ठेवा १३.सलग १६.खडाजंगी १७.दास १९.चेतना २०.हालचाल २१.तडस २४.हकनाक २७.लगाम २९.रुपाया ३१.विमान ३३.विवर ३५.लज्जत ३७.जळवात ४१.अंबर ४२.जलाशय ४३.मन ४४.लसलस ४७.अवयव ४८.सणक ५०.बळकट ५१.पाय ५३.राणीव ५५.खोक ५६.जळजळ ५७.विराजमान ५९.सणवार ६१.पार ६३.सापट ६६.काजळ ६८.गीतांजली ७०.करदाता ७१.कोमल ७३.टपाल ७४.जवस ७५.पवन ७६.होम ७७.राका

## क्रोधाचे प्रेमात रूपांतर
### - संत राजिन्दर सिंह जी महाराज

प्रत्येक दिवशी अशा घटना घडतात ज्यांचे आपल्याला वाईट वाटते. कधी कधी भयंकर राग ही येतो जेंव्हा कोणी आपल्याला दुखवतो अथवा आपल्याला नाराज करतो. अशी देखील उदाहरणे आहेत कि दुसऱ्याची हानी होतांना व केलेला आघात पाहून आपल्याला राग येतो. कधी कधी समाजातील एखाद्या समूहावर अन्याय होताना व सहन करताना पण बघायला मिळते. या सर्व प्रसंगी आपल्याला वाटते कि काही तरी चुकीचे घडत आहे. जे काही घडत आहे त्या कडे आपण दुर्लक्ष करता कामा नये. फरक फक्त एवढाच आहे कि त्या अन्यायाकडे आपण आपली प्रतिक्रिया कशी व्यक्त करतो? आपण निर्णय कसा घेतो? एकतर रागाने प्रतिक्रिया व्यक्त करतो किंवा रागावर नियंत्रण ठेऊन त्याचे प्रेमात रूपांतर करतो. मदर टेरेसा यांनी क्रोधावर प्रेमाने विजय मिळवण्याचा निर्णय घेतला होता.



जगात क्रोध व हिंसा भरलेली आहे. प्रत्येक गावात, शहरात, घरा घरा मध्ये रागाचा विस्फोट होताना दिसतो. या रागामुळे क्रोधामध्ये तेल टाकण्याचा प्रयत्न होतो. आपण रागावर पंखा चालवून त्याला विझवू शकत नाही. आपण या क्रोधाच्या अग्नीला प्रेमाच्या पाण्याने विझविले पाहिजे. क्रोधाच्या अग्नीला अग्नीने शांत करता येत नाही. रागाच्या या अग्नीला आपण प्रेमाने शांत करू शकतो. कोणतेहि भांडण झाल्यास रागाने बोलण्या ऐवजी प्रेमाने बोललो तर समोरच्याचा राग शांत होतो. वातावरणात रागीट विचारांचे तरंग वाढविण्या ऐवजी आपण प्रेमपूर्ण विचार पसरवुया. जेणेकरून वातावरण चांगले राहील.

या जगात सगळीकडे क्रोध व हिंसा पसरलेली आहे. तेंव्हा आपण सर्वांनी या जगात शांतता व प्रेमाचे भान ठेऊया. चला तर, या रागाला प्रेमाने जिंकूया आणि मग बघा आपल्या अशा वागण्याने प्रेममय लहरी सर्वत्र पसरतील आणि सगळीकडे शांतता व प्रेम नांदेल. मग तो दिवस दूर नाही की हे सर्व जग सुख, शांती व प्रेमाचे आश्रयस्थान बनेल.

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय**- बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# रस्ता सुरक्षा समितीच्या बैठकीत ३३३ अपघाती स्थळांवरील उपाययोजनांना मंजुरी

## अपघात वाहतूक कोंडी टाळण्यासाठी विविध मुद्यांवर चर्चा

**नाशिक । प्रतिनिधी**

रस्ता सुरक्षा समितीची तिसरी बैठक दि. ३० जून रोजी मनपा मुख्यालयात पार पडली. मनपा प्रभारी आयुक्त तथा प्रशासक भाग्यश्री बानायत यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. यावेळी मनपाच्या अधिका-यांसह आरटीओ, पोलिस आयुक्तालय, एनएचएआय, एमएसईडीसीएल, पीडब्लूडीचे अधिकारी व संदीप युनिव्हसिटीचे डॉ. नाकतोडे, प्रो. दधिच उपस्थित होते. शहर अभियंता शिवकुमार वंजारी यांनी मागील बैठकीचे इतिवृत्त वाचून सद्यस्थितील कामांचा आढावा घेतला. रस्ता सुरक्षा विषयक उपाययोजना संबंधाने उपसमितीने शहरात सर्व्हेक्षण केलेली ३३३ अपघात स्थळे आहेत. ही अपघात स्थळे भविष्यात ब्लॅक स्पॉट होऊ शकतात. त्यामुळे या ठिकाणी करावयाच्या उपाययोजनांना मंजुरी देण्यात आली.

झेब्रा क्रॉसिंग, पादचारी क्रॉसिंग, थर्मोप्लॅस्टिक पट्टे मारणे, गतीरोधक, कॅट आईस, वाहतूक मर्यादेचा फलक लावणे अशा विविध उपाययोजना करण्यात येणार आहेत. इंदिरानगर, राणेनगर येथील पुलाखालील बोगदा रुंदीकरणाचे काम सप्टेंबर, ऑक्टोबर महिन्यात सुरु होईल, अशी ग्वाही राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने यावेळी दिली. तसेच याठिकाणी असलेल्या बोगद्याची रुंदी वाढणार आहे. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी मुंबई नाका येथील सर्कलचा व्यास कमी करावा, अशी सुचना पोलिस उपायुक्त (वाहतूक) केली. त्याअनुषंगाने तज्ज्ञ एजन्सी म्हणून आयआयटी मुम्बई यांची नेमणूक करुन व्यास किती असावा, कोणत्या दिशेने किती असावा याचा अभ्यास करुन कार्यवाही करण्यात येईल असं बांधकाम विभागाने स्पष्ट केले. तसेच शहरातील प्रमुख चौकातील अतिक्रमण हटविण्याबाबत डिमार्केशन नगररचना विभागाने करुन दिले आहे. या ठिकाणी लवकरात-लवकर कारवाई करुन अतिक्रमण हटविण्यात येईल, असे अतिक्रमण विभागाने स्पष्ट केले आहे.

शहरातून एकूण ७० किमीचा महामार्ग जातो. राष्ट्रीय महामार्गावरील सहा सिग्नलचे नियंत्रण एनएचआयएकडे होते. मात्र मागील बैठकीत सिग्नलचे नियंत्रण मनपाने करण्यासाठी विनंती केली व त्यानुसार एनएचआयने ना हरकत प्रमाणपत्र दिले आहे. मनपाकडून लवकरच गरवारे, पाथर्डी फाटा, वडाळा नाका, द्वारका, आडगाव नाका, औरंगाबाद नाका हे बंद असलेले सहा सिग्नल सुरु करन्यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात आली आहे. पोलिसांकडून मनपाकडे वेळोवेळी शहरात २२ वाढीव सिग्नलची मागणी झालेली आहे. बैठकीतही गंगापूर रोडवरील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी या रस्त्यावरील चौकांमध्ये सिग्नलची आग्रही मागणी केलेली आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात येणार आहे. सद्यस्थितीत शहरात एकूण ५३ सिग्नल कार्यरत आहेत. त्यातील ४० स्मार्ट सिग्नल उभारणीची मंजुरी स्मार्ट सिटीकडे आहे. त्यापैकी २० स्मार्ट सिग्नलचे काम प्रगतीपथावर आहे.

शहरातील होर्डिंग, दिशादर्शक फलक यांच्या स्ट्रक्चरल ऑडीटबाबतही बैठकीत चर्चा झाली. ८४५ पैकी ८४२ होर्डिंगचे स्ट्रक्चरल ऑडीट झाले आहे. वाहतुकीस अडथळा ठरणा-या झाडांच्या फांद्या तोडण्याची सुचना करण्यात आली आहे. झाडांवर सुरक्षेसाठी रिफ्लेक्टिव्ह शिट लावण्यात आले होते. परंतु झाडाला ठोकलेले खिळे काढावे लागत आहेत. त्यामुळे त्याठिकाणी रिलेक्टिव्ह कव्हरींगचे जुने टायर बांधण्याची कार्यवाही केली जाणार आहे.

या बैठकीला पोलिस उपायुक्त (वाहतूक) मोनिका राऊत, अतिरीक्त आयुक्त प्रदीप चौधरी, शहर अभियंता शिवकुमार वंजारी, उपायुक्त विजयकुमार मुंढे, करुणा डहाळे, लक्ष्मिकांत साताळकर, श्रीकांत पवार, प्रशांत पाटील, अधिक्षक अभियंता उदय धर्माधिकारी, नगररचना उपसंचालक हर्षल बाविस्कर, कार्यकारी अभियंता संदेश शिंदे, सचिन जाधव, जितेंद्र पाटोळे, जनसंपर्क अधिकारी गिरीश निकम, एमएचएआयचे अभियंता शशांक अडके, संदीप युनिव्हसिटीचे डॉ. पी. एल. नाकतोडे, प्रो. शिशिर दधिच, सिव्हील टेक तर्फे सी. एन. कुलकर्णी, ब्लुमबर्ग संस्थेचे निशांत सावंत, टी. के. जसवंत उपस्थित होते.



### शाळा परिसराचा सर्व्हे

**जागतिक बँकेच्या मदतीने ब्लुमबर्ग फिलांथ्रोपीज इनिशिएटीव्ह फॉर ग्लोबल रोड सेफ्टी ही संस्था कार्यरत आहे. या संस्थेने शहरातील नाशिकरोड येथील मनपाच्या मुक्तीधाम शाळा क्र. ५७ आणि जुन्या आग्रा रोडवरील आदर्श इंग्लिश मीडियम स्कूल परीसराचा रोड सेफ्टीबाबत अभ्यास करुन उपाययोजना सुचविल्या आहेत. या संस्थेच्या प्रतिनिधींनी बैठकीत त्याबाबत सादरीकरण केले. शहरातील एकूण ११ शाळांचा सर्व्हे करुन तो मनपा, परीवहन विभागाला सादर केला जाणार आहे.**



# शेतकऱ्यांच्या शेतीची उत्पादकता वाढीसाठी आम्ही सदैव तत्पर

**एफएमसी उत्कर्ष इंडियाचे सौमित्र पूरकायस्थ यांचे प्रतिपादन**

**सिडको । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी एफएमसी उत्कर्ष इंडिया कार्य करणार आहे. शेतीचे दिवसागणिक तुकडे होत असल्याने त्यातून शेतकऱ्यांचे कौटुंबिक खर्चही भागत नाही. अशातच त्या शेतकऱ्यांच्या शेतातील शेतीचा पोत वाढवण्यापासून त्यांच्या पिकाची उत्पादकता व प्रतवारी वाढवण्यासाठी आमची प्रशिक्षित टीम काम करणार आहे. गिरणारे व परिसरातील टोमॅटो उत्पादकांना तर याचा सर्वाधिक फायदा होईल. असे प्रतिपादन एफएमसी उत्कर्ष कार्यक्रमाचे प्रमुख सौमित्र पूरकायस्थ यांनी नाशिक तालुक्यातील गिरणारे येथे शेतकरी मेळाव्यात केले.

यावेळी गिरणारे -दुगाव रस्त्यावरील गायत्री लॉन्सच्या सभागृहात शेतकरी मार्गदर्शन मेळावा पार पडला. यावेळी एफएमसी उत्कर्ष या कृषी क्षेत्रातील समूहाच्यावतीने आयोजित कार्यक्रमात उपसरपंच संजय थेटे, कृषी निविष्ठा संचालक भागवत थेटे, विक्री संचालक योगेंद्र जडोन, शिखा डोकानिया, विपीन चौधरी, संदीप थेटे, अमित प'डोल हे उपस्थित होते.

सुरुवातीस टोमॅटो उत्पादक शेतकरी नामदेव थेटे, अर्जुन थेटे, समीर थेटे, लक्ष्मण शिंदे, सुरज थेटे, सुधाकर धुळे, उत्तम बेंडकोली, नामदेव आचारी या शेतकऱ्यांचा शाल व तुळशी रोप देऊन सन्मान करण्यात आला.

# संत ज्ञानेश्वर महाराज मंदिरात महाअभिषेक

**लासलगाव । वार्ताहर**

येथील ब्राह्मण सेवा मंडळाच्या संत ज्ञानेश्वर महाराज मंदिरात आषाढी एकादशीनिमित्त महाअभिषेक संपन्न झाला.प्रथम वर्षाचे मानकरी ब्राह्मण सेवा मंडळाचे विश्वस्त प्रफुल्ल कुलकर्णी,अमृता कुलकर्णी तसेच शरद रघुनाथ पाठक,शुभांगी पाठक नासिक यांच्या हस्ते महाअभिषेक करण्यात आला.

ब्राह्मण सेवा मंडळाच्या संत ज्ञानेश्वर माऊली मंदिरात नेहमीच धार्मिक व सामाजिक कार्य राबविण्यात येते लहान मुलांवर संस्कार घडवण्यासाठी दर शनिवारी हनुमान चालीसा पठण होते तसेच भावी पिढी संस्कारक्षम होण्यासाठी सातत्याने समाज प्रबोधन कार्यक्रम घेण्यात येतात आषाढी एकादशी निमित्त माऊलींना महाअभिषेक करण्यात आला.या प्रसंगी शरद पाठक यांच्या वतीने संपूर्ण भजन साहित्य मंदिराला समर्पित करण्यात आले अभिषेक नंतर भजन व प्रसाद वाटप करण्यात आला

यावेळी मंडळाचे विश्वस्त सचिव दिलीप कुलकर्णी, उपाध्यक्ष वसंत दंडवते, खजिनदार शेखर कुलकर्णी, सदस्य आतिश कुलकर्णी, ब्राह्मण महासंघ विश्वस्त तथा मैत्रेयी महिला मंडळ अध्यक्ष स्मिता कुलकर्णी व परिसरातील बांधव उपस्थित होते.




# लासलगाव येथे राष्ट्रीय सिकल सेल ॲनेमिया निर्मूलन अभियान

**लासलगाव । वार्ताहर**

लासलगाव येथील ग्रामीण रुग्णालयात राष्ट्रीय सिकल सेल ॲनेमिया निर्मूलन अभियान कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.या वेळी ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधीक्षक डॉ बाळकृष्ण अहिरे यांच्या सह सर्व आरोग्य कर्मचारी व आरोग्य सेविक उपस्थित होते

यावेळी सिकल सेल ॲनेमिया बद्दल माहिती देताना वैद्यकीय अधीक्षक डॉ बाळकृष्ण अहिरे यांनी सांगितले की सिकलसेल या अनुवांशिक आजाराने दुर्गम भागात हातपाय पसरविण्यास सुरूवात केली असली तरी हा आजार नियंत्रित ठेवण्यासाठी सरकारच्या आरोग्य धोरण आणि सामाजिक संस्थांच्या सहकार्याने प्रयत्न सुरू आहे

या आजाराचे काय परिणाम होतात,सिकल सेल ऍनिमिया असणाऱ्या व्यक्तीला कोणत्या रंगाचे कार्ड देण्यात येते याची सविस्तर माहिती देण्यात आली तसेच आभा कार्ड योजने बद्दल माहिती या वेळी सांगण्यात आली.

यावेळी लासलगाव ग्रामीण रुग्णालय येथील वैद्यकीय अधीक्षक डॉ.बाळकृष्ण अहिरे, वडीतके नाना, श्रीमती अहिरे सिस्टर, श्रीमती जाधव सिस्टर, श्रीमती घुसळे सिस्टर, प्रणाली पाटील,वर्षा भालेराव, अर्चना खाडे, गणेश भवर, श्री माठ, श्री राठोड उपस्थित होते.

# देशातल्या व राज्यातील शेतकरी समृद्ध होवो– मंत्री भारती पवार

**लासलगाव ।** देशातील व राज्यातील शेतकरी समृद्ध होवो व यंदा चांगला पाऊस पडून शेतकऱ्याला भरघोस उत्पन्न मिळावे असे साकडे केंद्रीय मंत्री भारती पवार यांनी निफाड तालुक्यातील लासलगाव येथे विठुरायाच्या दर्शनासाठी सायंकाळी आले असता विठुराया चरणी साकडे घातले आहे.

केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री भारती पवार गुरुवारी सायंकाळी निफाड तालुक्यातील लासलगाव येथील विठ्ठल रुक्माई मंदिरात दर्शन घेतले यावेळी माझ्या भारत देशाला बलशाली करा तसेच सगळ्यांना चांगलं आरोग्य लाभू दे, कोरोनाचे संकट पूर्णपणे जाऊ दे, तसेच माझ्या देशातील व राज्यातील शेतकरी समृद्ध होवो व चांगला पाऊस पडून चांगले उत्पन्न मिळून त्याची भरभराट होऊ दे असे साकडे यावेळी विठुरायाला घातल्याचे भारती पवार यांनी सांगितले. यावेळी जिल्हा परिषदेचे माजी सदस्य डि के जगताप, बाजार समितीच्या माजी सभापती सुवर्णा जगताप, राजेंद्र चाफेकर यांच्यासह भाजपा पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.विठ्ठल रुक्मिणी मंदिरात श्री संत सेना चारीटेबल ट्रस्ट च्या वतीने भारती पवार व मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.ट्रस्टचे पदाधिकारी लासलगाव नाभिक समाज बांधव नाभिक महिला सखी मंचच्या पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# पिंपळगाव नाजिक खंडेराव मंदिर व शास्त्री नगर महादेव मंदिर वॉल कंपाऊंडचे उद्‌घाटन

**लासलगाव । वार्ताहर**

पिंपळगाव नजीक येथील ग्रामदैवत खंडेराव महाराज मंदिर व शास्त्री नगर येथील महादेव मंदिराच्या वॉल कंपाऊंडच्या कामाचे उद्घाटन लासलगाव बाजार समितीच्या संचालिका तथा सोनिया चॅरिटेबल ट्रस्टच्या अध्यक्षा सोनिया होळकर यांच्या हस्ते करण्यात आले.या प्रसंगी सोनिया होळकर यांनी प्रत्यक्ष भेट देऊन सुरू असलेल्या कामाची पाहणी करून समाधान व्यक्त केले.या वेळी सोनिया होळकर यांचा पिंपळगाव नजिक व शास्त्री नगर येथील ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला.



याप्रसंगी सरपंच काशिनाथ माळी,उपसरपंच मेघा दरेकर, खंडेराव मंदिराचे अध्यक्ष गंगाधर घोडे, सचिव राजेंद्र सावंत, कमल आढाव, संचालक लक्ष्मण घोडे, बबन घोडे, साहेबराव बागल, भाऊसाहेब घोडे, राजाराम घोडे, भाऊसाहेब घोडे, हिरामण घोडे, कैलास सोनवणे, सलिम शेख, ग्रामपंचायत सदस्या मंगल कुलकर्णी, अनुराधा आगळे, परसराम घोडे, ॲड.प्रशांत पाटील, ॲड. सुभाष देशमुख, ॲड तुकाराम जाधव, लतिफ तांबोळी, सुनिल ठोंबरे, मंजु ठोंबरे, सत्यजित मंडलीक, रंजन देशमुख, किशोर क्षिरसागर, बाळु सिमंत, ऋषी बकरे, अमोल कुमावत, करीम शेख, अमजत पठाण, अन्वर शेख, जुगलकिशोर दायमा, अनिल सीमंत, शादाब शेख, मनियार सर, प्रविण ठोंबरे, विजय खुटे, चेतन कांकरिया यांच्यासह ग्रामस्थ व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रमांचे सुत्रसंचालन अतुल आढाव यांनी केले.

### रामभाऊ शिंदे यांचे निधन



**नाशिक ।** दापूर येथील प्रगतीशील शेतकरी रामभाऊ नामदेव शिंदे (८०) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात सहा विवाहित मुली, मुलगा, जावई, सून, नातवंडे असा परिवार आहे. नाभिक एकता महासंघाचे सिन्नर तालुका उपाध्यक्ष अमोल शिंदे यांचे ते वडील होत.



# लासलगाव येथे राष्ट्रीय डॉक्टर्स दिनाच्या निमित्ताने वृक्षारोपण

**लासलगाव । वार्ताहर**

राष्ट्रीय डॉक्टर्स दिनाच्या निमित्ताने लासलगाव डॉक्टर असोसिएशन च्या वतीने वृक्षारोपण करून वृक्ष वाचवा वृक्ष जगवा असा संदेश देण्यात आला.तसेच शहरात वैद्यकीय व्यवसायाच्या रूपाने समाज सेवा करत असणाऱ्या सर्व डॉक्टरांचा सहकुटुंब सन्मान लासलगाव डॉक्टर असोसिएशनच्या अध्यक्ष डॉ संगीता सुरसे यांच्या हस्ते करण्यात आला.स्त्री रोग तज्ञ डॉ श्रीकांत आवारे यांना लोकमत लोकनेता पुरस्कार मिळाल्याबद्दल व सौ पुष्पाताई दरेकर यांची जेष्ठ महिला नागरिक अध्यक्षपदी निवड झाल्यामुळे त्यांचाही सत्कार करण्यात आला.डॉ विलास कांगणे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.डॉ श्रीदेवी चांडक यांनी सूत्रसंचालन केले.कार्यक्रम यशस्वीते साठी डॉ सुजित गुंजाळ, डॉ ऋता घनगाव, डॉ स्वप्निल जैन,डॉ अमोल शेजवळ, डॉ अनिल बोराडे यांनी सहकार्य केले

यावेळी डॉ.सुरेश दरेकर, डॉ. श्रीनिवास दायमा, डॉ.विजय बागरेच्या, डॉ.रायते, डॉ.प्रवीण डुंगरवाल, डॉ.नितीन न्याहारकर, डॉ.केंगे, डॉ.मृगेश शहा, डॉ.भूपेंद्र पाटील, डॉ.किरण निकम, डॉ.योगेश चांडक, डॉ.अमोल गायकर, डॉ.राहुल वाघ, डॉ.अविनाश दुधे, डॉ.श्रीकांत आवारे, डॉ.सागर घनगाव, डॉ. गौरव माठा, डॉ.प्रताप पवार, डॉ.खुशाल जाधव, डॉ.चारुदत्त अहिरे यांच्यासह असोसिएशन चे सदस्य उपस्थित होते.

# समाजोपयोगी कार्यामुळे जगभरात रोटरीला सन्मान - डॉ. कुलकर्णी

**नाशिक । प्रतिनिधी**

चांगले व समाजोपयोगी कार्य करण्यासाठी पैश्यापेक्षा दृढ संकल्पाची आवश्यकता असते आणि हाच संकल्प मनात ठेऊन पॉल हॅरिस यांनी सुमारे ११८ वर्षापूर्वी रोटरी रूपे लावलेल्या रोपट्याचे आज वटवृक्षात रुपांतर झाले असून याच जगभरात रोटरी सदस्यांना मानाचे स्थान असल्याचे प्रतिपादन अहमदनगरच्या स्नेहालय या समाजसेवी संस्थेचे संस्थापक डॉ. गिरीश कुलकर्णी यांनी केले. ते रोटरीच्या डिस्ट्रीक्ट ३०३० च्या नूतन व पहिल्याच महिला प्रांतपाल नाशिकच्या रोटे.आशा वेणुगोपाल यांच्या पदग्रहण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.




याप्रसंगी मंचावर समाजसेविका ॲड. मृणालिनी देशमुख, मावळते प्रांतपाल रोटे. आनंद झुनझुनवाला, रोटे किशोर केडिया, रोटे.बी. एन.वेणुगोपाल हे मान्यवर उपस्थित होते. आपल्या भाषणात गिरीश कुलकर्णी पुढे म्हणाले की, रोटरीला असलेली जागतिक मान्यता आणि सन्मान याचा अनुभव त्यांनी स्वत: एका प्रसंगात बांगलादेश येथे अनुभवला असून कोणतीही जात , धर्म, पंथ न बघता रोटरी सदस्य समाजकार्यात अग्रेसर असल्याचे देखील त्यांनी नमूद केले. गेल्या ११८ वर्षापसून जगभरात सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या रोटरीच्या भारतात एकूण ३९ रोटरी डिस्ट्रीक्ट कार्यरत असून डिस्ट्रीक्ट ३०३० चे कार्यक्षेत्र नाशिक, सिन्नर, मालेगाव, मनमाड, जळगाव, वर्धा, अकोला, अचलपूर, शेगाव, नागपूर, चंद्रपूर, हिंगणघाट असे असून या भागातील १०४ क्लबमधील हजारो रोटरी सदस्य सामाजिक काम करीत आहेत. २०२३-२४ च्या प्रांतपाल म्हणून नाशिकच्या रोटे. आशा वेणुगोपाल यांची निवड झाली असून रोटरी डिस्ट्रीक्ट ३०३० च्या इतिहासातील त्या पहिल्या महिला प्रांतपाल आहेत.

पदभार स्वीकारल्यानंतर बोलतांना रोटे. आशा वेणुगोपाल म्हणाल्या की, या वर्षी रोटरीचे जागतिक अध्यक्ष यांचे ब्रीदवाक्य ' क्रियेट होप इन द वर्ल्ड ' असे आहे. त्यास अनुसरून रोटरी डिस्ट्रीक्ट ३०३० मधील उपक्रमांची आखणी करण्यात आली आहे. या उपक्रमांमध्ये महिला, मुली तसेच समाजातील उपेक्षित घटकांमध्ये आशेचा किरण जागविण्याचा प्रयत्न केला जाईल. स्त्री सक्षमीकरणावर आणि सबलीकरणासाठी विशेष प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. यासोबत साक्षरता, प्रौढ साक्षरता, पर्यावरण, आरोग्य, आरोग्य सुविधा, महिला सक्षमिकरण, पोलियो निर्मुलन वर प्रामुख्याने उपक्रम राबविण्यात येतील असे त्यांनी नमूद केले.

सामाजिक कार्यकर्त्या ॲड. मृणालिनी देशमुख यांनी या वेळी बोलताना स्त्री समानताची सुरवात प्रत्येकाने आपल्या घरापासून करण्याचे आवाहन करून प्रांतपाल म्हणून एक स्त्रीच्या निवडीबाबत आनंद व्यक्त केला.

याप्रसंगी मावळते प्रांतपाल आनंद झुनझुनवाला यांनी गत वर्षीचा अहवाल सादर केला. याप्रसंगी नूतन वर्षाची डिरेक्टरी तसेच मासिकाचे विमोचन करण्यात आले.

सामाजिक उपक्रमाची सुरवात म्हणून काल पदग्रहण सोहोळ्याच्या दिवशीच गरजू विद्यार्थ्यांना ५ हजार सायकलींचे वाटप या प्रकल्पाचे उद्घाटन करण्यात आले. पहिल्या टप्प्यातील सुमारे एक हजार सायकलींचे वाटप करण्यात आले.

## न्यूज कॉलम

### दुचाकीच्या धडकेत सहा वर्षाच्या चिमुकल्याचा मृत्यू

**नाशिक ।** शहरातील किशोर सुर्यवंशी मार्गावरील ओमकार नगर कॉलनी रोडवर रस्ता ओलांडत असताना बुलेट दुचाकीच्या धडकेत एका सहा वर्षीय चिमुकल्याचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून संशयित बुलेट चालकास पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, अर्णव रोशन भाबड (वय ६) राहणार (सुप्रभा बंगलो क्रमांक ७७) असे बुलेटच्या धडकेत मृत्यू झालेल्या बालकाचे नाव आहे. अर्णव हा बालक काल शनिवार (दि.१०) रोजी सकाळच्या सुमारास आपल्या बंगल्यासमोरील रस्ता ओलांडत असतांना बिरसा मुंडा हॉस्पिटलकडून पेठरोडच्या दिशेने भरधाव वेगाने जाणाऱ्या बुलेट क्रमांक (एमएच १५ डीडब्ल्यू ८८००) या दुचाकीने त्यास जोरदार धडक दिली. या धडकेत अर्णवच्या डोक्याला जबर दुखापत झाल्याने त्यास चुलते राकेश भाबड यांनी तात्काळ शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले असता डॉक्टरानी त्यास तपासून मयत घोषित केले. तसेच या प्रकरणी म्हसरूळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक माळी करत आहेत. अर्णवच्या अपघाती मृत्यूमुळे त्याच्या कुटुंबियांना मोठा धक्का बसला आहे. दरम्यान, यावेळी बुलेट दुचाकीचालकाविरोधात कठोरात कठोर कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी मृत अर्णवच्या नातेवाईकांनी केली.

# निसर्ग मित्र समितीतर्फे वलवाडी युवा आदर्श शेतकऱ्यांचा सन्मान

**धुळे । प्रतिनिधी**



महाराष्ट्र शासन छत्रपती शिवाजी महाराज राज्यस्तरीय वनश्री पुरस्कार प्राप्त निसर्ग मित्र समिती तर्फे १ जुले रोजी निसर्ग मित्र समितीच्या वलवाडी स्थित कार्यालयात महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री ,हरीत क्रांतिचे जनक कै वसंतराव नाईक यांच्या जयंती निमित्ताने - महाराष्ट्र कृषी दिन व वन महोत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त उपवनसंरक्षक अधिकारी ॲड प्रभाकर वाघ यांच्या अध्यक्षतेखाली वन महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले, यावेळी प्रमुख अतिथी म्हणून गोंदूर येथील उद्यान पंडित कृषी भूषण विलासराव माळी,जिल्हा परिषदचे माजी सभापती शांताराम राजपूत,निसर्ग मित्र समितीचे संस्थापक प्रेमकुमार अहिरे, धुळे जिल्हाउपाध्यक्ष विलासराव देसले, आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी प्रथम माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन करून वृक्ष पूजनाने कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले, तर यावेळी धुळे तालुक्यातील सेंद्रिय व उत्कृष्ट शेती करणारे युवा शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी हरितक्रांतीचे जनक माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंती निमित्ताने व महाराष्ट्र दिनानिमित्ताने काही निवडक युवा शेतकऱ्यांचा आदर्श शेतकरी सन्मान म्हणून गौरवण्यात आले यात अनिल सुभाष पाटील गोंदूर, चंद्रकांत मनोहर पाटील गोंदूर माजी जिल्हा परिषद सदस्य शांताराम दादा राजपूत वलवाडी अनंत शिवाजी ठाकरे पढावद योगेश डोमन पाटील निमडाळ, दीपक दुरधन वाघ रोहाणे तालुका शिंदखेडा संदीप हिम्मतसिंग गिरासे निकुंभे नंदलाल बाबुलाल सूर्यवंशी फागणे ,एकनाथ रंगराव सोनवणे मोरदड, रत्नाकर आत्माराम बैसाणे फागणे, यतिष भगवान चौधरी वलवाडी ,रमेश हिरालाल गुजर सोनगीर अनिल नामदेव जगताप चिंचवार राजेश चैत्राम महाले लामकानी या युवा आदर्श शेतकऱ्यांचा यावेळी सन्मान करण्यात आला, यानिमित्ताने अनेक युवा आदर्श शेतकऱ्यांनी मनोगत व्यक्त केलीत.

याप्रसंगी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी निसर्ग मित्र समितीचे बोरीस येथील अध्यक्ष युवा शेतकरी प्राध्यापक विजय देवराम पाटील, पाठ्यक्रम कवी व निसर्ग मित्र समितीचे पारोळा तालुका अध्यक्ष शिवव्याख्याते प्रेमचंद अहिराव, वनश्री उद्धव पंडित कृषी भूषण पुरस्कार विजेते विलासराव माळी यांनी विशेष सहकार्य केले ,कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी निसर्ग मित्र समितीचे धुळे जिल्हा कार्याध्यक्ष तथा मोरदड हायस्कूलचे चेअरमन राजेंद्र देविदास भदाणे, धुळे शहर अध्यक्ष प्रा एच ए पाटील ,धुळे तालुका उपाध्यक्ष प्राचार्य डॉक्टर एस आर पाटील, शिंदखेडा तालुका अध्यक्ष आर आर सोनवणे, शिंदखेडा तालुका संपर्कप्रमुख सुधीर सनेर, धुळे जिल्हा उपाध्यक्ष प्राचार्य आर ए पाटील, निसर्ग मित्र समितीचे धुळे तालुका संघटक चेतन भदाण ,धुळे शहर संपर्कप्रमुख प्रा चंद्रशेखर विसपुते, पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते प्रशांत बच्छाव, पत्रकार तथा आदर्श शेतकरी प्रदीप पाटील ,सोनगीर चे अध्यक्ष पुरूषोत्तम धनगर, निसर्ग मित्र समितीचे कार्यालय प्रमुख निसर्ग दादा आहिरे,निसर्ग मित्र अक्षय पवार, आदींनी विशेष परिश्रम घेतले कार्यक्रमाचे प्रास्ताविक धुळे जिल्हा अध्यक्ष तथा सेवानिवृत्त उपशिक्षणाधिकारी डी बी पाटील, सूत्रसंचालन राज्य महासचिव तथा से नि केंद्रप्रमुख संतोषराव आबा पाटील, तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन शिंदखेडा तालुका अध्यक्ष आर आर सोनवणे यांनी केले. यावेळी परिसरातील सामाजिक कार्यकर्ते पर्यावरण प्रेमी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते अशी माहिती निसर्ग मित्र समितीचे संस्थापक प्रेमकुमार अहिरे, जिल्हा अध्यक्ष डी बी पाटील यांनी पत्रिकांद्वारे दिली आहे.

# सत्कारातून सर्व समाज घटकांना मिळेल प्रेरणा- डॉ. ठाकरे

## डॉक्टर्स डे निमित्त आयएमएर्फे पुरस्कारांचे वितरण




**नाशिक । प्रतिनिधी**

रुग्णसेवेत स्वतःला झोकून देतांना आरोग्य व्यवस्था सुदृढ करण्याचा प्रयत्न अनेक डॉक्टरांच्या माध्यमातून होतो आहे. गेल्या अनेक वर्षांपासून असेच योगदान देणाऱ्या ज्येष्ठ डॉक्टरांचा आज सत्कार होत आहे. यातून सर्व समाज घटकांना चांगले काम करण्यासाठी प्रेरणा मिळेल, असे प्रतिपादन इंडियन मेडिकल असोसिएशन, महाराष्ट्रचे नियोजित अध्यक्ष डॉ. दिनेश ठाकरे यांनी केले.

इंडियन मेडिकल असोसिएशनच्या नाशिक शाखेतर्फे डॉक्टर्स डे चे औचित्य साधून शालिमार येथील आयएमए सभागृहात जीवन गौरव पुरस्कार वितरण समारंभ आयोजित केला होता. या कार्यक्रमात डॉ.ठाकरे बोलत होते. यावेळी आयएमए नाशिकचे अध्यक्ष डॉ.विशाल गुंजाळ, सचिव डॉ.माधवी गोरे-मुठाळ, उपाध्यक्षा डॉ.मनिषा पवार, खजिनदार डॉ.पंकज भट, नियोजित अध्यक्ष डॉ.सुधीर



संकलेचा यांच्यासह पुरस्कारार्थी व्यासपीठावर उपस्थित होते.

डॉ. ठाकरे पुढे म्हणाले, डॉक्टरांच्या समस्या सोडविण्यासाठी आयएमए कटिबद्ध आहे. आरोग्य व्यवस्था पुरविणाऱ्या डॉक्टरांचे आरोग्य चांगले राहावे, यासाठी आयएमएतर्फे विविध योजना उपलब्ध आहेत. असे सांगत या योजनांची माहिती त्यांनी उपस्थित डॉक्टरांना दिली.

प्रास्तविकात डॉ.विशाल गुंजाळ म्हणाले, वैद्यकीय क्षेत्रातील कर्मयोगी व्यक्तींचा आज सत्कार होतो आहे. निवड समितीने परिश्रम घेत या पुरस्कारांची निवड केली. डॉक्टर्स डे हा आपल्यासाठी स्वाभिमान दिवस आहे. आयएमएचे कामकाज कॅशलेस, डिजिटल करण्याचा प्रयत्न केलेला आहे. विक्रमी ३५ लाइफ मेंबर नुकतेच झालेले आहेत.

कार्यक्रमात परिचय डॉ.मनिषा जगताप यांनी करुन दिला. सूत्रसंचालन डॉ.शलाका बागूल व डॉ.प्रेरणा शिंदे यांनी केले. आभार डॉ.माधवी गोरे-मुढाळ यांनी मानले. पुरस्कार निवड समितीचे सदस्य डॉ. प्रशांत देवरे, डॉ.हेमंत सोननीस, डॉ.अनिरुद्ध भांडारकर यांच्यासह आयएमएचे सदस्य उपस्थित होते. दरम्यान डॉक्टर्स डे निमित्त सकाळी रक्तदान शिबिर पार पडले. या शिबिरात डॉक्टर त्यांचे कुटुंबीययांसह इतरांनी सहभागी होत रक्तदान केले. तसेच वृक्षारोपण कार्यक्रमाचेही आयोजन यावेळी केले होते.

**जीवन गौरव पुरस्कारार्थी**

कार्यक्रमामध्ये डॉक्टरांना जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यामध्ये डॉ. युवराज पवार, डॉ. पूनम शिवदे, डॉ. यतींद्र दुबे, डॉ. अभय सुखात्मे, डॉ. तुषार देवरे, डॉ. संजय वेखंडे यांचा समावेश होता.

# कृषी दिनाचे औचित्य साधून निमगुळ येथील शेतकऱ्यांसाठी जनजागृती अभियान



**धुळे । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी कृषी क्षेत्रात केलेली भरीव कामगिरी केली आहे, एक जुलै वसंतराव नाईक यांची जयंती कृषी दिन म्हणून किंवा कृषी संजीवनी सप्ताह औचित्य साधून निमगुळ येथील कृषी दुकानदार दिलीप खिवसरा यांनी शेतकऱ्यांना नॅनो तंत्रज्ञानातील युरिया व डीएपी बद्दल सविस्तर माहिती सांगितली.

नॅनो तंत्रज्ञान हे पर्यावरण पूरक आहे, त्यामुळे वायू , मृदा, जल प्रदूषण कमी होण्यास मदत होते, शेतकऱ्यांनी नॅनो युरिया व डीएपी वापर करून कमी खर्चात आपले उत्पन्न वाढावे असे दिलीप खिवसरा यांनी सांगितले, नॅनो डीएपी मध्ये नायट्रोजन अधिक फॉस्फरस लिक्विड फॉर्म मध्ये असते, नत्र व स्फुरद पानाद्वारे मिळाल्यानंतर पीक जोमाने वाढत असते, तसेच नॅनो डीएपी व नॅनो युरिया वाहतूक व साठवून साठी खर्च कमी येतो, त्यामुळे आपण नवीन तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त वापर करून उत्पन्न कमी खर्चात जास्त घ्यावे असे आव्हान केले यावेळी दिलीप सूर्यवंशी, रामराव देवरे, शांताराम ठाकरे, बाबूलाल ठाकरे, सुरेश चव्हाण, अनिल ठाकरे, सुभाष शिंदे, बुरा मोरे, प्रवीण मराठे, दिलीप चव्हाण आधी शेतकरी उपस्थित होते

## राष्ट्रीय वाचन दिन उत्साहात साजरा

**शिरपूर ।** श्री विलेपार्ले केळवणी मंडळ, मुंबई संचलित तांडे ता. शिरपूर येथील मुकेश आर. पटेल निवासी सीबीएसई शाळेत राष्ट्रीय वाचन दिन साजरा करण्यात आला. परिपाठाच्या वेळी राष्ट्रीय वाचन दिवसाचे महत्त्व सांगण्यात आले. देशव्यापी साक्षरतेला प्रोत्साहन देण्यासाठी हा दिन साजरा करण्यात येतो. इयत्ता पहिली ते चौथीच्या वर्गात गोष्टींची पुस्तके वाचन, इयत्ता पाचवी ते सातवी पर्यंत ई-बुक्स वाचन तर इयत्ता आठवी ते दहावीच्या वर्गात वर्तमानपत्रांतील संपादकीय पानाचे वाचन हे उपक्रम घेण्यात आले. शाळेच्या उपप्राचार्या श्रीमती जुली चाको यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय वाचन दिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

## कै.वसंतराव नाईक यांना अभिवादन




**धुळे ।** महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री कै.वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त येथील जिल्हा परिषदेत अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी धुळे जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा अश्विनी पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती बुवनेश्वरी एस., जिल्हा परिषदेचे माजी कृषी सभापती प्रा. अरविंद जाधव यांच्यासह अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# रोटरी क्लब धुळे अध्यक्षपदी दिपक जैन तर सचिवपदी विलास कोठावदे

**धुळे । प्रतिनिधी**



गेल्या अनेक वर्षांपासून विविध सामाजिक उपक्रमात सातत्याने अग्रेसर असलेल्या रोटरी इंटरनॅशनल या आंतरराष्ट्रीय पातळीवरील सेवाभावी संस्थेच्या अंतर्गत कार्यरत रोटरी क्लब धुळे च्या २०२३ - २४ या कालावधी साठी अध्यक्ष म्हणून शहरातील सुपरिचित मार्बल व्यावसायिक दिपक जैन तर सचिव पदावर वैद्यकीय क्षेत्रातील व्यावसायिक विलास कोठावदे यांची नुकतीच निवड झाली असून दि एक जुलै २०२३ पासून त्यांचा कार्यकाळ सुरू झाला आहे. त्यांच्या सोबतच उमेश अग्रवाल उपाध्यक्ष पदावर, मनोज शहा खजिनदार पदावर, माजी अध्यक्ष आशिष अग्रवाल,प्रेसिडेंट इलेक्ट राहुल कुलकर्णी सहसचिव पदावर दिपक अहिरराव, महेश मालपाणी सहकोषाध्यक्ष पदावर, कार्यकारी सचिव पदावर प्रा सुनील मुंदडा, क्लब ट्रेनर पदावर राजेश वाणी, ॲडमिनीस्ट्रेटीव चेअर पदावर राहुल अग्रवाल, मेंबरशिप चेअर पदावर अभय अग्रवाल, पब्लिक इमेज चेअर आशुतोष जोशी, सर्व्हिस प्रोजेक्ट चेअर पदावर समिर बहाळकर, टी आर एफ चेअर प्रदीप शहा, एनव्हॉयर्मेंट चेअर राहुल सोनवणे, लिटरसी चेअर डॉ जगदीश गिंदोडिया, रायला चेअर महेश कुलकर्णी, आर सी सी संजय भतवाल, युथ सर्व्हिसेस शांताराम पाटील या पदाधिकाऱ्यांची निवड जाहीर करण्यात आली आहे. अध्यक्ष सचिव व सर्व नूतन पदाधिकाऱ्यांनी येत्या वर्षभरात विविध समाजाभिमुख उपक्रम राबविण्याचा मानस व्यक्त केला आहे.

# थाळनेरात सिकलसेल ॲनिमिया निर्मूलन अभियान अंतर्गत कार्यक्रम

**धुळे । प्रतिनिधी**





राष्ट्रीय सिकलसेल ॲनिमिया निर्मूलन अभियान अंतर्गत ग्रामीण रुग्णालय थाळनेर अंतर्गत ऑनलाइन कार्यक्रम घेण्यात आला. आमदार काशीराम पावरा यांनी भ्रमनध्वनीद्वारे ग्रामीण रुग्णालयात कार्यक्रम विचारणा केली. तसेच नियोजना बाबत माहीती जाणून घेतली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सूचनेनुसार व अमरीशभाई पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सिकलसेल ॲनिमिया निर्मूलन अभियान राबविण्यात येत आहे. जिल्हा परिषद सदस्य भैरवी प्रेमचंद शिरसाठ अध्यक्षस्थानी होते.

शिरपूर पंचायत समिती उपसभापती विजय बागुल यांच्या हस्ते उद्घाटन झाले. सरपंच मेघा पाटील, ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. गुलाबराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम झाला.

डॉ. पाटील यांनी राष्ट्रीय सिकलसेल ॲनिमिया निर्मूलन अभियान अंतर्गत मार्गदर्शन केले. सौ. शिरसाठ यांनी मनोगत व्यक्त केले. श्री. बागुल यांनी रुग्णालयातील व्यवस्था व स्वच्छता याविषयी मार्गदर्शन केले. सरपंच पाटील यांनी ग्रामीण भागातील व परिसरातील ग्रामस्थांना अडचणी येऊ नये याबाबत माहिती दिली.

प्रेमचंद शिरसाठ, संदीप पाटील यांनी रुग्णालयात येणाऱ्या अडचणी व स्वच्छते विषयी चर्चा केले. अमोल पाटील यांनी स्वागत केले. सचिन कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. योगेश पाटील यांनी आभार मानले. वैद्यकीय अधिकारी डॉ. शुभम मोरे, डॉ. सागर पाटील, औषध निर्माण अधिकारी सतीश महाजन, कार्यालयीन अधीक्षक प्रवीण सोनार, प्रयोगशाळा तंत्रज्ञ रवींद्र महिरे, प्रयोगशाळा सहाय्यक ज्ञानेश्वर सौंदाणे, अजय भिल, जयश्री समीर, श्रीमती राजपूत, श्रीमती मस्के, वर्षा बैसाणे, कविता शिरसाठ, श्रीमती ज्योती बोरसे, श्रीमती महाले, श्रीमती बोरसे, योगेश सोनवणे, दीपक चांदणे, मिलिंद मोरे, सोपान धनगर आदी उपस्थित होते.

ADMISSION शारदा शैक्षणिक व सामाजिक संस्था ADMISSION

**विद्याधन महाविद्यालय, वलवाडी, धुळे**

NAAC Accredited 'B' Grade

वडेल रोड, एमएसईबीजवळ, वलवाडी, धुळे

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव, कोड नं. 200111

B.Sc | B.C.A | M.M.S./ M.C.M.

डिप्लोमा उत्तीर्ण झालेल्या S.Y. Bsc. ला प्रवेश SC/ST साठी मोफत

संपर्क - प्रा. ललिता निकम - ८८६२०४४७९१ प्रा. जागृती पाटील - ७८८७९३४३६५

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र विद्यापीठ, नाशिक, कोड नं. 5299A

B.A., B.C.A., B.Sc., M.A. M.C.A., M.B.A.

सर्व अभ्यासक्रमांना सत्यप्रतीवर (झेरॉक्स) प्रवेश मिळेल

संपर्क - प्रा. हर्षल पाटील - ९४२१२८३५७७ श्री. नितेश पाटील - ९९२२११६४३८

प्रा. भुषण पाटील - ७७०९१००७९८

शासन मान्यताप्राप्त एम.एस.बी.टी.ई. कोड नं. 2053

P.G.D.M.L.T. Advanced Diploma in Medical Laboratory Technology

पात्रता - बीएस्सी केमेस्ट्री, बॉटनी, झुलॉजी, मायक्रो बायोलॉजी/बी.फार्म/बी.ए.एम.एस/ बी.डी.एस./एम.बी.बी.एस.

- संपर्क - प्राचार्य डॉ. के. बी. पाटील ९४२२२८८५१८, सौ. शारदा पाटील - ९४२३४९६३४४

प्राचार्य. डॉ. आर.बी. पवार - ९४२०३७५७३५

प्रा. डॉ. योगेश बोरसे - ९४२३३७८९३६ श्री. हर्षल पाटील - ९४२१२८३५७७